ePaper

प्रफुल पटेल, फडणवीस केंद्रीय मंत्रिमंडळात? भाजपच्या वरिष्ठ नेत्यांत खलबते

| वर्ष - 7 | अंक -60 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- मावळात नवा गडी; नवं राज्य?!
- पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 30 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# घड्याळ घायाळ, सत्तेची चावी भाजपकडेच!

# अजित पवार देवेंद्र(नि)वासी!

## » राष्ट्रवादीतील नाराजीनाट्याची अखेर; अजित पवार पाचव्यांदा उपमुख्यमंत्री



### » शिवसेनेपाठोपाठ वर्षभराच्या अंतरातच राष्ट्रवादीत फूट पाडण्यात भाजपला यश

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बरोबर दोन महिन्यांपूर्वी शरद पवार यांच्या राजीनामा नाट्यापासून राष्ट्रवादीत सुरू झालेल्या नाराजी नाट्याचा शेवट अजित पवार यांच्या बंडाने झाला! लगेचच अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांचा शिंदे मंत्रिमंडळात समावेश झाला. अजित पवार यांनी या विधानसभेत तिसऱ्यांदा तर एकूण पाचव्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शिवसेनेपाठोपाठ वर्षभराच्या अंतरातच राष्ट्रवादीत फूट पाडण्यात भाजपला यश आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पुनरावृत्ती करीत आपलाच खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे, असा दावा अजितदादांनी केला आहे. या घडामोडींमध्ये महाविकास आघाडी कमकुवत करण्याची भाजपची खेळी यशस्वी ठरली आहे.**

२०१९च्या विधानसभा निवडणुकीपासून राज्यात धक्कादायक राजकारणाची पडलेली परंपरा कायम राहिली आहे. अजित पवार यांनी बंड करीत भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादीने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दिल्याचे अजित पवार यांनी जाहीर केले. लगेचच पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला.

### 2 मे ते 2 जुलै..

२ मे रोजी मुंबईत झालेल्या पुस्तक प्रकाशन समारंभात शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली होती. त्याची पक्षात तीव्र प्रतिक्रिया उमटली. पवारांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी सर्व नेतेमंडळींनी विनंती केली होती. तेव्हा पवारांचा राजीनामा स्वीकारण्यात यावा, अशी भूमिका मांडणारे अजित पवार एकमेव नेते होते.

शरद पवार यांचे २ मेचे राजीनामा नाट्य ते अजित पवार यांचे २ जुलैचे बंड याची परिणती राष्ट्रवादीतील फुटीत झाली. अजित पवार हे यांचे हे दुसरे बंड आहे.

### अजितदादांना किती आमदारांची साथ?

»राष्ट्रवादीच्या ५३ आमदारांपैकी अजित पवार यांच्या बंडाला किती आमदारांची साथ आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. कारण पक्षात फूट पडल्याचा दावाच पवार यांनी केलेला नाही. शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे यांनी आपण शिवसेनेचा त्याग केलेला नाही. फक्त नेतृत्व बदल केला, असा दावा करीत आपलीच शिवसेना खरी, असा युक्तिवाद केला होता. तोच प्रयोग आता अजित पवार करीत आहेत. राष्ट्रवादीचे नाव आणि चिन्ह हे आपल्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले.

### एकनाथ शिंदे यांचे महत्त्व कमी?

»अजित पवार यांच्या पाठिंब्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महत्त्व साहजिकच कमी होणार आहे. राष्ट्रवादीच्या ४० आमदारांचे पाठबळ मिळाल्याने भाजपप्रणीत सरकार अधिक भक्कम झाले आहे. अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे सारेच मंत्री हे अनुभवसंपन्न आहेत. त्यांना सरकारच्या कामकाजाची बारीकसारीक माहिती आहे. शिंदे व अजित पवार हे दोघेही अन्य पक्षांतील असल्याने देवेंद्र फडणवीस यांना सध्या तरी उपमुख्यमंत्रीपदी कायम ठेवून दोघांवर अंकुश ठेवला जाईल.



"देशभरातील विरोधी पक्षांची मोट बांधायला निघालेल्यांच्या पक्षाची बोट फुटली आहे. कोणाला गुगली टाकली तर कुणाला क्लीन बोल्ड केले म्हणणारेच कसे क्लीन बोल्ड झाले, हिट विकेट झाले हे देशाने पाहिले.

– **एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री



"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विकासाची भूमिका असून देशाला खंबीर नेतृत्व दिले आहे व जगभरात त्यांचा सन्मान होत आहे. आम्ही शिवसेनेबरोबर गेलो, तर भाजपबरोबरही जाऊ शकतो. या निर्णयाला पक्षातील बहुतेकांचा पाठिंबा आहे.

– **अजित पवार,** उपमुख्यमंत्री



"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या धोरणावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भाजप-शिवसेना युती सरकारमध्ये सहभागी होण्याचा हा निर्णय राज्य व देशहिताचा आहे. – **देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

# अजित पवारांच्या शपथविधीनंतर बारामतीत 'थोडी खुशी थोडा गम'!

## » समर्थकांमध्ये कुठे आतिषबाजी तर कुठे नाराजी

। बारामती। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवारांनी शिंदे-फडणवीस सरकारसोबत हातमिळवणी करत उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. त्यांच्या या निर्णयानंतर समर्थकांमध्ये उत्साह आहे. दरम्यान बारामतीत अजित पवारांच्या समर्थकांनी त्यांच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. समर्थकांनी फटाके फोडत जल्लोष साजरा केला आहे. तर बारामतीतील जेष्ठांमध्ये नाराजीचा सूर आहे.**



राष्ट्रवादीचे नेते अजित पवार त्यांच्या सहकाऱ्यांसह राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले आहेत. त्यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. पवारांनी शपथ घेतल्यानंतर बारामतीत थोडी खुशी थोडा गम असे वातावरण निर्माण झाले आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यामुळे युवकांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला आहे. तर शरद पवारांच्या विरोधात अजित पवारांनी बंड पुकारल्यामुळे जेष्ठांमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे.

बारामती विधानसभा मतदार संघाचे गेली अनेक वर्षांपासून सातत्याने प्रतिनिधित्व करणाऱ्या अजित पवारांच्या बंडामुळे राष्ट्रवादीला धक्का बसला आहे. मात्र बारामतीत अजित पवारांच्या समर्थकांनी फटाके फोडत आनंद व्यक्त केला. बारामतीत पक्षाने यासंबंधी अद्याप अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. तसेच बारामतीत झालेल्या जल्लोषात पक्षाचे प्रमुख पदाधिकारी सहभागी नसल्याचे दिसून आले आहे. पक्षाचे काही माजी नगरसेवक आणि काही कार्यकर्त्यांनी येथील भिगवण चौकात फटाके फोडत एकमेकांना मिठाई वाटत आनंद व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी पुन्हा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या बारामतीत अजित पवारांच्या या भूमिकेमुळे संभ्रम निर्माण झाला आहे.

त्यामुळे राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी माध्यमांना काहीही बोलण्यास तयार नव्हते. माध्यमांचे प्रतिनिधी शहर आणि तालुका पक्ष कार्यालयाजवळ राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांशी बोलण्याचा प्रयत्न करत होते. तेव्हा राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते नो कमेंटस म्हणून बोलत होते.

### गोपीचंद पडळकर काय म्हणाले...



»पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश चौफेर प्रगती करत आहे. राज्यात भाजप-सेना सरकारने गेल्या एक वर्षात अनेक धडाडीचे निर्णय घेतले आहेत. ही बाब लक्षात आल्याने राष्ट्रवादीतील काही लोक आमच्या सोबत आले असतील. त्यांचे स्वागत आहे, अशा शब्दांत भाजपचे आमदार गोपिचंद पडळकर यांनी रविवारच्या सत्तानाट्याविषयी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. पडळकर हे मोदी @ ९ कार्यक्रमाच्या निमित्ताने आज बारामतीत होते. त्यानंतर त्यांनी बारामतीत पत्रकारांशी संवाद साधला.पडळकर म्हणाले, रविवारी राष्ट्रवादीतील काहींनी शिंदे-फडणवीस यांच्या नेतृत्वात शपथ घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात चौफेर विकास सुरू आहे. रस्त्यांच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आपला देश पोहोचला आहे. मोदी हेच सक्षम नेतृत्व असल्याचे लक्षात आल्याने राष्ट्रवादीतील काहींनी शपथ घेतली आहे. त्यांचे स्वागत आहे. राष्ट्रवादीतील दुफळीबाबत ते म्हणाले, हा त्यांच्या पक्षातील अंतर्गत विषय आहे. एका दिवसात सगळ्या बाबी समोर येतील असे काही नाही. अजून बऱ्याच गोष्टी पुढे यायच्या आहेत. त्यानंतर या विषयावर बोलता येईल. शरद पवार यांनी जनतेत जात पक्षाची मोट पुन्हा बांधणार असल्याचे वक्तव्य केले होते. त्यासंबंधी पडळकर म्हणाले, ते गेली ४० वर्षे जनतेतच आहेत. १९९९ ला पक्ष स्थापन केल्यापासूनही जनतेत आहेत. परंतु त्यांना कधीही एकहाती बहुमत मिळविता आलेले नाही. अजित पवार यांच्या सत्तेतील सहभागामुळे भाजपच्या मिशन बारामतीचे काय होणार या प्रश्नावर ते म्हणाले, देशात भाजपशिवाय पर्याय उरलेला नाही. भाजपने विकासाबरोबरच सर्वसामान्यांना न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. पक्ष आणखी जोमाने लोकांमध्ये जात संघटन मजबूत करेल.

# पुणे आणि कोकणाला जोडणारा महत्त्वाचा रस्ता पुढील ३ महिने बंद!

## » प्रशासनाचा मोठा निर्णय

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुरक्षिततेच्या कारणासाठी भोरहून महाडकडे जाणारा वरंध घाट शनिवारपासून (१ जुलै) ते ३० सप्टेंबरपर्यंत सर्व प्रकारच्या अवजड वाहनांसाठी बंद करण्याचा निर्णय रायगड जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. याचा फटका राज्य परिवहन महामंडळाच्या बस व मोठे ट्रक, इतर सहाचाकी वाहनांना बसणार आहे. या काळात फक्त लहान मोटारी व दुचाकी वाहनांना घाटातून प्रवेश देण्यात येईल.**

त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून दुरुस्त करण्यात आलेला हा घाट पावसाळ्यात वाहतुकीसाठी अद्याप असुरक्षितच असल्याचे स्पष्ट होत आहे. भोर बाजूनेही हा घाट अवजड वाहनांसाठी बंद करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविणार आहोत, अशी माहिती भोरचे प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांनी दिली. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे घाटामध्ये अनेक ठिकाणी दरडी पडणे, माती वाहून येणे, रस्ता खचणे असे प्रकार झाले होते. गेल्या पावसाळ्यानंतर सार्वजनिक बांधकाम खात्याने कोट्यवधी रुपये खर्चून महाड व



भोर तालुक्यांच्या हद्दीत रस्त्याची दुरुस्ती केली. यंदाही हवामान विभागाने रायगड जिल्ह्यात मुसळधार पर्जन्यवृष्टीचा अंदाज व्यक्त केला आहे. सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महसूल व पोलिस अधिकाऱ्यांनी वरंध घाटामध्ये प्रत्यक्ष पाहणी केली.

### निविदा प्रकिया खोळंबली

वरंध घाट हा महाड-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचा भाग आहे. या रस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ८२३ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. मात्र, अजून या कामाची निविदा प्रक्रिया सुरू झालेली नाही.

# सायबर चोरट्यांकडून ज्येष्ठ नागरिकाची ८९ लाखांची फसवणूक

। पुणे । महाईन्यूज ।



आयुर्विमा पॉलिसी मुदतबाह्य झाल्याचाी बतावणी करुन सायबर चोरट्यांनी डेक्कन जिमखाना भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची ८८ लाख ९४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका ज्येष्ठ नागरिकाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार हे भांडारकर रस्ता भागात राहायला आहेत. तक्रारदारांची खासगी बँकेची आयुर्विमा कंपनीची पॉलिसी आहे. सायबर चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. करोना काळात त्यांनी पॉलिसीचे हप्ते भरले नव्हते. चोरट्यांनी बँक कर्मचारी असल्याची बतावणी केली होती. मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून पैसे न भरल्यास आयुर्विमा पॉलिसी मुदतबाह्य ठरेल, असे सांगितले होते. हप्ते भरल्यानंतर पॉलिसी सुरू होईल, असे सांगून सायबर चोरट्यांनी जाळ्यात ओढले.

# नावाला बचत गट, आता आमची वेगळीच वट

# सिद्धिकडून वृध्दिकडे'!

## प्रकल्प सिद्धीमुळे महापालिकेच्या उत्पन्नात कोट्यवधींची वृध्दी, प्रशासनाच्यावतीने महिला बचत गटांचे खास अभिनंदन

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**आर्थिक वर्ष संपण्याच्या शेवटी मिळकत तथा मालमत्ता कर वसुली मोहीम महापालिकेकडून तीव्र केली जाते. त्यासाठी प्रसंगी मिळकतही जप्त केल्या जातात. पण, २०२३-२४ या आर्थिक वर्षात पिंपरी-चिंचवड महापालिकेने या कर वसुलीसाठी वेगळाच फंडा अंमलात आणला. त्यामुळे पहिल्या तीन महिन्यांतच पन्नास टक्के मिळकतधारकांनी साडेचारशे कोटी रुपयांचा कर जमा केला. पिंपरी महापालिकेच्या इतिहासातील ही आतापर्यंतची विक्रमी करवसुली ठरली. त्याबद्दल प्रशासनाने महिला बचत गटांचे खास अभिनंदन केले आहे. कारण त्यांच्यामुळे हे उत्पन्न कमी कालावधीत पालिकेला मिळाले आहे.**




या वर्षापासून मिळकतकर बिलवाटपाचे काम महिला गटांकडे पालिकेच्या करसंकलन विभागाने सोपविले. प्रकल्प सिद्धी असे नाव या प्रकल्पाला दिले. सिद्धिकडून वृध्दिकडे' ही त्याची टॅगलाईन होती. हा निर्णय पालिकेसाठी खरोखर मैलाचा दगड शाबीत झाला, अशी प्रतिक्रिया प्रशासनाने आज दिली. वेळेत बिले मिळाल्यामुळे वेळेत नाही, तर वेळेआधी कराचा भरणा झाला, असे करसंकलन विभागातून सांगण्यात आले. अवघ्या 90 दिवसांत 447 कोटी रुपये पिंपरी महापालिकेच्या तिजोरीत मिळकतकर रुपाने जमा झाले. नमूद करण्याजोगी बाब म्हणजे त्यातील तब्बल २९१ कोटी ८१ लाख रुपयांचा करभरणा हा ऑनलाईन झाला आहे. उद्योगनगरी असली, तरी त्यात पिंपरी-चिंचवडला (PIMPRI-CHINCHWAD) निवासी मिळकतधारकांनीच सिंहाचा वाटा (2 लाख 68 हजार 6) उचलला आहे.

निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 2 हजार 203 नोंदणीकृत मालमत्ताधारकांपैकी पन्नास टक्के म्हणजे 3 लाख 3 हजार 350 जणांनी तीन महिन्यांतच 447 कोटी 3 लाख 96 हजार रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. १७ करसंकलन कार्यालयांपैकी आयटीयन्स वास्तव्याला असलेल्या वाकड झोनमध्ये सर्वाधिक 39 हजार 600, सांगवीत 34 हजार 694, चिंचवडला 29 हजार 303, तर थेरगावमध्ये 28 हजार 368 मालमत्ताधारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. तर सर्वात कमी तळवडे झोनमध्ये 4 हजार 131 मालमत्ताधारकांनी कर भरला आहे.



### शहर अधिक सुंदर, होण्यासाठी दक्षता घेतली जाईल

**या ऐतिहासिक कामगिरीचे सर्व श्रेय जबाबदार, प्रामाणिक आणि जागरूक करदात्यांना असल्याचे सांगत पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांनी त्यांचे आभार मानले आहेत. तसेच हा कररुपी पैसा शहराच्या शाश्वत विकासाचा पाया राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. त्यातून शहराच्या पायाभूत सुविधा जागतिक दर्जाच्या होतील, यावर मी वैयक्तिक लक्ष देईल, असे ते म्हणाले. तर, हे सांघिक यश आहे, अशी प्रतिक्रिया अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिली. शहर अधिक सुंदर, होण्यासाठी यातून दक्षता घेतली जाईल, असे ते म्हणाले.**

# तोतया क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी निघाला सराईत तडीपार इराणी

## सातारा,नाशिक, ठाणे, भाईंदर, खंडाळा, बोईसर आदी ठिकाणी वीस गुन्हे

।पिंपरी । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवडमधील गुन्हेगारीत यावर्षी मोठी वाढ झाली आहे.त्यातही मावळातील सूनत्रांमुळे तेथे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.आता,तर गुन्हेगारांचे धाडस एवढे वाढले आहे की, ते पोलीस बनूनच गुन्हे करू लागल्याने पोलिसांचे डोकेदुखी आणखी वाढली आहे.**



पुण्यातून तडीपार झालेला सराईत गुन्हेगार आबालू झाफर इऱाणी (रा. इराणी वस्ती,शिवाजीनगर) हा पिंपरी-चिंचवडमध्ये येऊन गुन्हे करीत होता. क्राईम ब्रँचचा पोलिस अधिकारी असल्याचे सांगत त्याने काहींना गंडा घातला होता. चाकण येथे नाना पवार (वय ५२,रा.हिंजवडी) यांना २७ मे रोजी क्राईम ब्रँचचा पोलीस अधिकारी असल्याचं सांगून त्यांच्याकडील साडेतीन तोळ्याची सोन्याची चेन हातचलाखीने त्याने लांबवली होती. तर, भोसरीत त्याने ३ जूनला कलावती कांबळे (वय ६२) या ज्येष्ठ महिलेचीही अशीच फसवणूक करत त्यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले होते. अशाप्रकारे त्याने सातारा,नाशिक,ठाणे,भाईंदर,खंडाळा, बोईसर आदी ठिकाणी वीस गुन्हे केले होते.

### चार लाखांचा चोरीचा ऐवज जप्त

**हा भामटा पिंपरी चिंचवड )मध्ये निगडी येथे येणार असल्याची खबर गुन्हे शाखा युनिटचे जमादार शिवानंद स्वामी यांना काल मिळाली होती. त्यानुसार या युनिटचे पीआय जितेंद्र कदम, पीएसआय गणेश माने व पथकाने सापळा लावून पोलिसांनी त्याला पकडले. यावेळी त्याच्याकडे क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी असल्याची चार बनावट ओळखपत्रे मिळाली. त्याच्याकडून पाच तोळे सोन्याचे दागिने,महागडी स्पोर्ट्स बाईक असा चार लाखांचा चोरीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.**

**दुसऱ्या प्रकारात,तर चौघांची टोळीच पोलीस असल्याची बतावणी**

# सत्याच्या काळ्याकभिन्न सावल्या




**जगात गेली अनेक वर्षे 'पोस्ट ट्रुथ' या संकल्पनेची चर्चा चालू आहे. त्याला मराठीत सत्योत्तर, उत्तर-सत्य किंवा सत्य पश्चात असे म्हणतात. असत्याला सत्याचा पेहराव करून जगात मिरविणे, हा त्याचा थोडक्यात अर्थ आहे. माणूस असे कदाचित इतिहासपूर्व काळापासून करीत आला असेल.**



अमेरिकेच्या अध्यक्षपदी खोटारड्या डोनाल्ड ट्रम्प यांची निवड झाल्यानंतर 'सत्य पश्चात' या संकल्पेनची पुन्हा जोरदार चर्चा सुरू झाली. म्हणजे ते निमित्त झाले. निमित्ताचा निकष लावला तर भारतात रोज हीच चर्चा व्हायला हवी. इतके आपले सामाजिक जीवन असत्यमय आहे. या वैचारिक चर्चेची नव्याने संधी दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खरे तर आभारच मानायला हवेत. सत्याचा पेहराव चढविलेल्या असत्याच्या अंगणात गुगली, खंजिर, कात्रजचा घाट ही सगळी भावंडे गुण्यागोविंदाने खेळत असतात. राजकारण हे स्वच्छ मनाने, निकोप स्पर्धेतून आणि विकासाच्या चर्चेतून करायवाचे देशकार्य नसून परस्परांना फसवून, एकमेकांची माणसे फोडून आणि आयत्यावेळी विश्वासघात करून करावयाचे जणू अधो-विश्वातले शौर्यकर्म आहे; असा संस्कार महाराष्ट्रावर गेली अनेक दशके सातत्याने होतो आहे. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी सकाळी राजभवनात जाऊन शपथ घेणे, ही राजकीय घोडचूक होती. मात्र, या 'घोड्यांना' तिथवर नेऊन सत्तेचे पाणी औट घटकेसाठी प्यायला लावणारे शरद पवार हे याच साऱ्या नाट्याचे सूत्रधार होते, हे आता स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात शरद पवार यांनी या प्रकारचा खेळ सन १९७८ पासून सुरू केला आहे. महत्त्वाचे राष्ट्रीय नेते होऊनही त्यांना अजून असले खेळ खेळण्यात स्वारस्य वाटावे, ही धक्कादायक आणि आश्चर्यकारक गोष्ट आहे.

शरद पवार यांच्या 'लोक माझे सांगाती.. राजकीय आत्मकथा' या पुस्तकाची सुधारित आवृत्ती अलीकडेच आली आहे. यात महाविकास आघाडीची जन्मकथा सांगताना (पान क्रमांक ३१४ वर) पवार लिहितात, 'सरकार स्थापनेचा मार्ग प्रशस्त होत असतानाच एक अभूतपूर्व वळण आले. २३ नोव्हेंबरच्या सकाळी साडेसहाला फोन खणखणला. 'राष्ट्रवादीचे काही आमदार राजभवनात पोचलेले असून, अजित पवार यांनी भाजपला राष्ट्रवादीचा पाठिंबा असल्याचं पत्र सादर केलं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर अजितदादा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत,' अशी माहिती मला देण्यात आली. तो मोठा धक्का होता. महाविकास आघाडीचं सरकार बनवण्यासाठी राष्ट्रवादीचा पुढाकार असतानाच हे घडणं, म्हणजे आमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह होतं...' पवार यांनी पुण्यात जी पत्रकार परिषद घेतली; तीत तर भाजपसोबत सरकार स्थापनेची चर्चा म्हणजे 'गुगली' होता, असा दावा केला आहे. मग त्यांना त्या सकाळी फोनवर धक्का कसा काय बसला? आता तर ते मी या चर्चेतून चार दिवस आधीच बाहेर पडल्याचे सांगत आहेत. मग त्यांनी तेव्हाच ठाकरे आणि काँग्रेसला सावध का केले नाही? फडणवीस-अजितदादा यांच्या शपथेची पहाटघटिका येईपर्यंत उद्धव ठाकरे यांना 'या नाट्याची' कल्पना देणे पवारांना आवश्यक वाटले नाही. त्यांच्या आत्मकथेवरून तरी तसे वाटत नाही. पवारांचे परवाचे बोलणे आणि त्यांचे आत्मकथेतील कथन, हे ताडून पाहिल्यावर कुणाच्याही मनात सुरेश भटांच्या दोनच ओळी येतील. 'एक साधा प्रश्न माझा लाख येती उत्तरे; हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे?'

खरे तर या पहाटखेळात भाजप, फडणवीस यांच्या विश्वासार्हतेला जसा धक्का बसला; तितकाच मोठा धक्का अजित पवार यांनाही बसला. हेच अपेक्षित असावे. मात्र, पवार आत्मकथेत अजितदादांच्या या वागण्याचे खापर त्रिपक्षीय चर्चेतील काँग्रेसच्या अडेलतट्टूपणावर फोडतात. ही तर कमालच झाली. म्हणजे, या 'गुगली'ने भाजप, ठाकरे, काँग्रेस आणि अजित पवार या सगळ्यांची एकदम विकेट पवारांना घ्यायची होती. १९७८ मध्ये कोण कितव्या इयत्तेत होते, याचा हजेरीपट आता मांडला जात आहे. मात्र, पवार यांनी तेव्हा मुख्यमंत्री असणाऱ्या वसंतदादा पाटील या उमद्या, सरळ मनाच्या नेत्याचा विश्वासघातच केला होता. सन १९९९ मध्ये काँग्रेसमधून बडतर्फी ओढवून घेऊन पुन्हा तोच खेळ करण्यात आला. सन २०१९ मध्ये काय काय झाले, हे सगळे अजून बाहेर आलेले नाही. त्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या नशिबी जी तीन सरकारे आली; त्या तिन्हींचा जन्म उजळ माथ्याने उजेडात होण्याऐवजी कारस्थानी खलबतखान्यांच्या अंधारात झाला आहे. महाराष्ट्रात ही कारस्थानांची संस्कृती नेमकी कशी सुरू झाली, याचा हिशेब इतिहास एक दिवस मांडेलच. तोपर्यंत, ज्या ज्या नेत्यांना सत्याचे उमाळे येतील; त्यांनी त्या त्या वेळी सोयीचे वाटणारे सत्य सांगत राहावे.

## संपादकीय »

### मूठ झाकलेलीच!

***केंद्राच्या धर्तीवर शेतकऱ्यांसाठी दरमहा सहा हजार रु. अनुदान, एक रुपयात पीक विमा आणि महाराष्ट्राच्या जवळपास १२ कोटी जनतेस पाच लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय साहाय्य यांचा जमेच्या रकान्यात आवर्जून उल्लेख करावा लागेल.***

मोठे लक्ष्य गाठायचे तर सरकारी खात्यांत समन्वय आणि धोरण असावे लागते. त्या आघाडीवर सरकारला फारशी प्रगती साध्य करता आली नसल्याचे सरकार समर्थकांनाही पटेल... आव्हानास सामोरे जाऊन त्यावर मात करणे हा जसा विजयाचा मार्ग असतो; तसाच आव्हानांस झुलवत ठेवून पराजय टाळण्यातही विजय असतो, हे व्यवस्थापकीय सत्य लक्षात घेतल्यास एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकारच्या वर्षपूर्तीमागील राजकीय मर्म समजून घेता येईल. शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस या त्रयीच्या 'महाविकास आघाडी'चे सरकार उलथून शिंदे-फडणवीस यांचे सरकार सत्तेवर आले त्यास यंदाच्या ३० जून रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षपूर्तीबद्दल सरकारचे अभिनंदन. आपल्याकडे सत्ताधारी किमान पाच वर्षांसाठी निवडले जातात.

**आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. त्यांच्याएवढे श्रेष्ठ गुरुजी, आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी आपली श्रद्धा आहे.**

## तस्मै श्री गुरवे नम:

आचार्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे शास्त्रात कथन केले आहे. एवढेच नव्हे तर महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. ज्ञानियांचा राजा म्हणून ज्याला मानतात, त्या ज्ञानदेवांनीसुध्दा ज्ञानेश्वरी लिहिताना 'व्यासांचा मागोवा घेतू' असे म्हणून सुरुवात केली.

व्यासपौर्णिमेच्या दिवशी 'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत.

दत्तभक्तांसाठी हा पूण्यपावन दिवस! या दिवशी शिष्य आपल्या गुरुची पंचोपचारे पूजा करतो. आपल्याला मिळालेल्या कृपादानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पूढील वाटचालीसाठी आशिर्वाद घेतो. वेगवेगळ्या पंथ व संप्रदाय हा इश्वरभक्तीकडे जाणारे मार्ग शोधणारे मुमुक्षु - पारमार्थिक या दिवशी भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

खरं गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे



प्रत्यक्ष आचरण करणे. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन! गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतो :

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः॥

आषाढ शुद्ध पौर्णिमा हा दिवस 'गुरुपौर्णिमा' म्हणून स्वीकारला आहे. त्यानिमित्त महर्षी व्यासांनी वेदाचे चार भाग, सहा शास्त्रे, अठरा पुराणांच्या रचना करून मानवी जीवनाला संपन्न केले आहे. या सर्वांतून भगवंताचे गुणगान, त्यांचे यशगान करीत मनुष्याला जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले आहे. या अमोलिक कार्याची कृतज्ञता म्हणून भारतीय पूर्वसुरींनी व्यासांचे पूजन या दिनी केल्यामुळे या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' अथवा "गुरुपौर्णिमा' असे म्हणतात. गुरु दोन प्रकारचे असतात एक गुरु! एक सदगुरु!

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदे गटाची कोंडी!

## » भाजपच्या नेतृत्वाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सूचक इशारा

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार यांना बरोबर घेऊन भाजपच्या नेतृत्वाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सूचक इशाराच दिला आहे. तसेच महाविकास आघाडी सरकारच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आणि त्यातही अर्थमंत्री असलेले अजित पवार यांच्याकडून निधी वाटपात सातत्याने अन्याय होत असल्याची ओरड करत थेट बंडाचा झेंडा उगारणाऱ्या शिंदे यांच्या गटातील आमदारांची नव्या घडामोडींमुळे कोंडी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत..**



एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवूनही राज्यातील राजकीय वातावरण बदलण्यात फारसे यश येत नाही हे भाजप नेत्यांच्या निदर्शनास आले होते. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये राज्यातून ४० पेक्षा अधिक खासदारांचे पाठबळ मोदी यांना मिळाले होते. महाविकास आघाडीशी सामना करणे कठीण असल्याची जाणीव भाजपच्या नेत्यांना झाली होती. यातूनच राष्ट्रवादीत फूट पाडण्याची खेळी भाजपने केली. अजित पवार यांना बरोबर घेऊन भाजपने शिंदे यांचे महत्त्व आपसूकच कमी केले आहे.

### शिंदे गटाच्या तिन्ही आमदारांचा हिरमोड

»गोगावले यांची पंचाईत मंत्रीपद मिळणार या आशेवर गेले वर्षभर असणारे शिंदे गटाचे महाडचे आमदार भरत गोगावले यांची पंचाईत झाली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याशी त्यांचे अजिबात पटत नसे. रायगडमधील शिवसेनेच्या तिन्ही आमदारांनी तटकरे यांच्या विरोधात तक्रारी केल्या होत्या. सत्ताबदल होताच शिंदे गटाने खासदार सुनील तटकरे व त्यांच्या कन्येची मतदारसंघात अडवणूक करण्याचा प्रयत्न केला होता. नव्या रचनेत आदिती तटकरे यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने शिंदे गटाच्या तिन्ही आमदारांचा हिरमोड झाला आहे.

शिंदे गटाचे काही मंत्री व आमदारांमुळे भाजपची डोकेदुखी वाढली होती. यातूनच मध्यंतरी काही मंत्र्यांना वगळण्याची सूचना शिंदे यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती.

राष्ट्रवादीचा एक गट बरोबर आल्याने शिंदे गट आता दबावाचे राजकारण करू शकणार नाही. मध्यंतरी जाहिरातीवरून भाजपने शिंदे गटाच्या विरोधात जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती.

मंत्रिमंडळ विस्तारात वर्णी लागेल या आशेवर असणाऱ्या शिंदे गटातील आमदार सत्तेत तिसरा वाटेकरी आल्याने अस्वस्थ असल्याच्या चर्चेने आता जोर धरला असून स्थानिक राजकारणातही राष्ट्रवादीतून सत्तेत सहभागी झालेल्या आमदारांच्या स्पर्धेला शिंदे गटाला तोंड द्यावे लागणार आहे.

---

## भाजपचा सामना कसा? उद्धव ठाकरेंपुढं नवा पेच

।मुंबई।



एकनाथ शिंदे यांच्या बंडाने राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार खाली खेचले, तरीही लोकसभा निवडणुकीत भाजपला महाविकास आघाडी म्हणूनच टक्कर द्यायची, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये ठरले होते. दुसरीकडे भलेही जागा वाटपावरून काँग्रेस पक्ष आघाडीमधून बाहेर पडला, तरीही उद्धव ठाकरे यांचा पक्ष आणि राष्ट्रवादीने एकत्रित राहून लोकसभा निवडणुकीत भाजपचा सामना करायचा, अशी बोलणी ठाकरे-पवार यांच्यात सुरू होती. मात्र राष्ट्रवादीमध्येच फूट पडल्याने लोकसभा निवडणुकीत भाजपचा सामना काँग्रेसच्या सोबतीने करायचा, की स्वबळावर अशा कात्रीत उद्धव ठाकरे अडकल्याचे समजते.

राज्यातील नव्या शिंदे-फडणवीस सरकारने महाविकास आघाडीमधील सर्वच पक्षांना अडचणीत आणले असले, तरी आपल्या तिघांची आघाडी हीच खरी भाजपच्या विरोधातील ताकद असल्याची पुरेपूर कल्पना ठाकरे गट, काँग्रेस व राष्ट्रवादीच्या आघाडीच्या नेत्यांना होती. त्यामुळेच त्यांनी आघाडीच्या बैठकांमधून लोकसभा निवडणूक आघाडीमध्येच लढविण्याच्या सूचना तळागाळातील कार्यकर्ते तसेच पदाधिकाऱ्यांना करायला सुरुवात केली होती. मागच्या लोकसभा निवडणुकीत भाजप आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने सर्वाधिक जागा जिंकल्या होत्या. भाजप आणि शिवसेना या दोघांची राज्यातील एकगठ्ठा हिंदू मते ही सर्वात मोठी व्होट बँक असल्याने त्याचा त्यांना चांगलाच फायदा झाला होता.

## मान्सूनने सहा दिवस आधीच व्यापला देश

### »गतवर्षीची पुनरावृत्ती घडली पण पावसाबद्दल मोठी अपडेट

। शिराळा ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात मान्सून उशिरा दाखल झाला असला तरी जूनच्या शेवटच्या काही दिवसांमध्ये त्यानं वेग पकडला. यामुळ सहा दिवस अगोदरचं मान्सूननं देश व्यापला आहे. भारतीय हवामान विभागाने यासंदर्भात माहिती देताना राजस्थान, हरियाणा आणि उर्वरित पंजाबचा भाग मान्सूनने व्यापल्याचे जाहीर करत सरासरी तारखेच्या सहा दिवस आधीच तो पूर्ण देशात पोहोचल्याचे सांगितले. सर्वसाधारणपणे ८ जुलैपर्यंत न्सून संपूर्ण देशात पोहोचतो.**

मान्सून यंदा देशात ८ जूनला दाखल झाला. त्यानंतर १२ जूनपर्यंत महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत प्रवास करून बिपर्जय चक्रीवादळामुळे पुढील प्रवास रेंगाळला. २२ जूनपासून या प्रवासाला चालना मिळाली आणि त्यानंतर अवघ्या १० दिवसांत मान्सूनने देशातील उरलेला प्रवास पूर्ण केला. हा प्रवास इतर वेळी १ जून ते ८ जुलै या कालावधीत सुरू असतो. सध्या मान्सूनचा अक्ष त्याच्या सर्वसाधारण स्थितीपासून दक्षिणेला सरकलेला आहे. उत्तर प्रदेशावर चक्रीय वात स्थिती आहे. तसेच महाराष्ट्राच्या किनाऱ्यापासून केरळच्या किनाऱ्यापर्यंत ढगांची द्रोणीय स्थिती निर्माण झालेली आहे. बंगालच्या उपसागराच्या दक्षिण भागात तसेच अंदमानच्या समुद्रात चक्रीय वात स्थिती



निर्माण झालेली आहे. या प्रभावाखाली भारताच्या दक्षिण द्वीपकल्पामध्ये मेघगर्जनेसह विजांचाही अनुभव येईल. मध्य भारत, ईशान्य भारत, पश्चिमी हिमालयीन भाग येथे मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उर्वरित देशामध्ये मात्र तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. महाराष्ट्रामध्ये पुढील चार दिवसांमध्ये बहुतांश सर्व ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर सोमवारनंतर विदर्भातही बहुतांश ठिकाणी पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्रात मंगळवारी पावसाची व्याप्ती वाढू शकेल तर मराठवाड्यामध्ये तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# अनुपमा फेम रुपाली गांगुलीने पूर्ण केले तिचे स्वप्न, खरेदी केली 1 कोटींची कार



टीआरपीच्या यादीत प्रसिद्ध टीव्ही सीरियल अनुपमा नेहमीच टॉपवर राहते. हा शो नेहमीच प्रेक्षकांमध्ये सावली बनून राहतो. या शोची मुख्य अभिनेत्री रुपाली गांगुलीला अनुपमाच्या भूमिकेत खूप पसंत केले जात आहे. तिच्या दमदार अभिनयामुळे रुपालीने लोकांच्या हृदयात खास स्थान निर्माण केले आहे. तिला तिच्या चाहत्यांकडून भरभरून प्रेम मिळत आहे. दरम्यान, रुपाली तिच्या वैयक्तिक आयुष्यातही खूप आनंदी आहे. तिचे मोठे स्वप्न तिने पूर्ण केले आहे.

सर्वाधिक मानधन घेणारी टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली आज खूप कमाई करत आहे. दरम्यान, तिने आपल्या कार कलेक्शनमध्ये आणखी एका लक्झरी कारची भर घातली आहे. स्वतः रुपालीने तिच्या सोशल मीडियावरून ही माहिती सर्वांसोबत शेअर केली आहे. अभिनेत्रीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये रुपाली मर्सिडीज शोरूममध्ये पती आणि मुलासोबत दिसत आहे. तिने आपली नवीन कार घेतली आहे.



स्वप्न पाहण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल. माझ्या स्वप्नांना सत्यात उतरवण्याची संधी दिल्याबद्दल राजन शाहीचे आभार', राजन शाही अनुपमा या मालिकेचे दिग्दर्शक आहेत. स्वतः रुपाली गांगुलीने व्हिडिओ शेअर करून तिचा आनंद सर्वांसोबत शेअर केला आहे. अभिनेत्रीने मर्सिडीज बेंज GLE 300D कार खरेदी केली आहे. ते मिळाल्यानंतर तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. व्हिडीओमध्ये दिसत आहे की कंपनीने तिची कारही रुपालीला मोठ्या थाटात सुपूर्द केली आहे.


# 'तुम्ही राहू द्या!', अमृता फडणवीसांचं गाणं ऐकताचं पब्लिकनं लावला डोक्याला हात..

महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांची नेहमीच चर्चा असते. कुण्या कलाकरांचीही इतका चाहता वर्ग नसेल तितका अमृता फडणवीस यांचा आहे. त्याच्या गाणी त्याची फॅशन स्टाईल अशा बऱ्याच गोष्टीमुळे त्या नेहमीच चर्चेत असतात. 'मूड बनालीया' हे गाणं हे प्रेक्षकांना खुपच आवडलं. अल्पवधीतच या गाण्याने मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार केला.

अशातच त्यांनी आता आगामी BHARATEEYANS या चित्रपटात गाणे गायले आहे. 'सारे जहां से अच्छा हिंदोस्ता हमारा' हे या गाण्याचे बोल आहेत. प्रतासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे गाणं प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सत्या कश्यप यांचे हे गाणे आहे. तर अमृता यांनी या गाण्याला आवाज दिला आहे. अमृता यांनी हे नवीन गाणं त्याच्या इन्स्टाग्रामवरही शेअर केलं. त्याच्या या गाण्याला मोठ्या प्रमाणात नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या कमेंटस करणं सुरु केले आहे.






# शहनाजचे चमकले तारे!



बिग बॉस 13 ची स्पर्धक शहनाज गिल हिला बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यापूर्वी खूप प्रसिद्धी मिळाली आहे. शहनाज गिलने अद्याप बॉलिवूडमध्ये एंट्री घेतलेली नाही, पण तिच्याकडे ऑफर्सची लाईन लागली आहे. अभिनेत्री शहनाज सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये प्रवेश करणार आहे. मात्र त्याआधी तिला आणखी एक मोठा प्रोजेक्ट मिळाला आहे. निर्माते निखिल अडवाणीच्या नव्या चित्रपटात शहनाज गिल दिसणार आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर हा चित्रपट पाच महिलांच्या कथेवर आधारित असेल. यामध्ये शहनाज व्यतिरिक्त वाणी कपूर देखील काम करत आहे. या महिला केंद्रित चित्रपटात प्रत्येक अभिनेत्रीला महत्त्वाची भूमिका दिली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचे शूटिंग गेल्या वर्षी सुरू होणार होते, परंतु हवामानाच्या समस्येमुळे ते होऊ शकले नाही. आता त्याचे शूटिंग मार्च 2023 मध्ये भोपाळमध्ये सु रू होईल.

बातम्यांमध्ये असेही म्हटले जात आहे की शहनाज गिल तिच्या पात्रात येण्यासाठी खूप कष्ट करत आहे. कामात सुधारणा करण्यासाठी तिने अभिनयाचे प्रशिक्षणही घेणे सुरू केले आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी मिताक्षरा कुमार यांच्याकडे आहे. मिताक्षरा सध्या दिग्गज दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या 'हिरा मंडी' या वेबसिरीजमध्ये काम करत आहे. 'बाजीराव मस्तानी' आणि 'पद्मावत' या चित्रपटांदरम्यान त्यांनी भन्साळींना मदत केली आहे. शहनाज गिल निखिल अडवाणी आणि सलमान खान तसेच निर्मात्या रिया कपूरच्या नवीन चित्रपटाचा एक भाग आहे. शहनाज गिलच्या या चित्रपटाचे दिग्दर्शन रिया कपूरचा पती करण बुलानी करणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत अनिल कपूर आणि भूमी पेडणेकरही असणार आहेत.

# सईचा फुलमती लूक चर्चेत



हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या एका लूकमुळे चांगलीच चर्चेत आली आहे. सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते. याच फोटोमुळे ती नेहमी चर्चेत असते. नुकतंच सईने एक अतरंगी फोटोशूट केलं आहे. या फोटोंमध्ये सईने फुलमती लूक केला आहे. सईच्या या फोटोवर सईचे चाहते अनेक कमेंट्स करत आहेत.

मराठमोळी अभिनेत्री सई ताम्हणकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या एका लूकमुळे चांगलीच चर्चेत आली आहे.

सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते.नुकतंच सईने एक अतरंगी फोटोशूट केलं आहे.या फोटोंमध्ये सईने फुलमती लूक केला आहे.

# बेन स्टोक्स लढला पण इंग्लंड हरला..!

## Ashes 2023 : ऑस्ट्रेलियाचा दुसरा थरारक विजय

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय क्रिकेट संघाला लवकरच नवीन प्रशिक्षक मिळणार आहे. या पदासाठी तीन जणांची नावे पुढे आली आहेत. अमोल मजुमदार आणि तुषार आरोठे या माजी क्रिकेटपटूंनी या पदासाठी अर्ज केले आहेत. त्याचबरोबर इंग्लंडच्या जॉन लुईसचे नावही समोर येत आहे..**

ASHES 2023 : या मालिकेतील दुसरा सामना कोणता संघ जिंकणार, हे कोणालाच सांगता येत नव्हते. कारण या सामन्यात वेगवेगळी वळणं येत होती. बेन स्टोक्स दीड शतकानंतर बाद झाला आणि सामना पुन्हा रंगतदार झाला.

टालंडन : इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा कसोटी सामना चांगलाच रंगला. बेन स्टोक्स यावेळी इंग्लंडला विजय मिळवून देईल, असे वाटत होते. पण जोश हेझलवूडने त्याला १५५ धावांवर असताना बाद केले आणि त्यामुळे ऑस्ट्रेलियाला या मालिकेत सलग दुसरा विजय नोंदवता आला. यापूर्वी झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने थरारक विजय साकारला होता. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने दुसरा कसोटी सामनाही जिंकत मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने हा सामना ४३ धावांनी जिंकला. बेन स्टोक्स या सामन्यात चांगलाच लढला, पण इंग्लंडचा संघ मात्र हरल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे त्याची ही मोठी खेळी व्यर्थ ठरली.स्ट्रेलियाने दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडला विजयासाठी ३७१ धावांचे आव्हान दिले होते. पण या आव्हानाचा पाठलाग करत असताना इंग्लंडची ४ बाद ४५ अशी अवस्था झाली होती. त्यावेळी हा सामना इंग्लंड चौथ्याच दिवशी गमावणार, अशी चर्चा सुरु होती. पण त्याचवेळी इंग्लंडच्या संघासाठी धावून आला तो कर्णधार बेन स्टोक्स. कारण स्टोक्सने यावेळी दीड शतकी खेळी साकारली आणि सामन्याचा नूर पालटला. स्टोक्सला यावेळी चांगली साथ मिळाली ती बेन डकेटची. या दोघांनी पाचव्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचली. इंग्लंडचा डाव आता सावरतोय असे वाटत होते खरे, पण त्याचवेळी जोश हेझलवूडने इंग्लंडला मोठा धक्का दिला.



### इंग्लंडला सर्वात मोठा धक्का

» जोशने यावेळी डकेटला ८३ धावांवर बाद केले आणि संघाला मोठी विकेट मिळवून दिली. त्यानंतर इंग्लंडचा संघ ढासळेल असे वाटत होते, पण त्यावेळी स्टोक्स हा खेळपट्टीवर ठाण मांडून उभा राहीला. स्टोक्स यावेळी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा चांगला प्रतिकार करत होता, त्यामुळे इंग्लंडचा संघ आता जिंकेल असे वाटत होते. पण तेवढ्यात पुन्हा एकदा या सामन्याला वेगळे वळण मिळाले. स्टोक्सने आपले दीड शतक पूर्ण केले आणि तो आता इंग्लंडला विजय मिळवून देणार असे दिसत होते. त्यावेळी सामन्याला मोठे वळण मिळाले. कारण त्यावेळी पुन्हा एकदा जोशने ऑस्ट्रेलियाला मोठे यश मिळवून दिले. जोशने यावेळी स्टेक्सला बाद केले आणि इंग्लंडला सर्वात मोठा धक्का दिला. कारण स्टोक्सवर इंग्लंडच्या विजयाची मदार होती. पण जोशने त्याला बाद केले आणि सामना ऑस्ट्रेलियाच्या बाजूने फिरला. स्टोक्सने यावेळी ९ चौकार आणि ९ षटकारांच्या जोरावर १५५ धावांची दमदार खेळी साकारली.

# अजित आगरकरने कडव्या विरोधानंतरही केलं फातिमाशी लग्न!

।मुंबई।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सध्याच्या घडीला अजित आगरकर हा सर्वात जास्त चर्चेत आहे. पण त्याचवेळी अजित आगरकरची प्यारवाली लव्हस्टोरीची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. कारण अजितचं लग्न त्यावेळी कोणालाच मान्य नव्हतं. पण त्यानंतर त्योन फातिमाशी लग्न कसं केलं, हे आता समोर आले आहे.**

अजित हा एका मराठमोळ्या घरातला मुलगा. मुंबईत त्याची कारकिर्द सुरु झाली. मुंबईच्या संघात दमदार कामगिरी करून तो भारतीय संघात दाखल झाला. भारतीय संघात दाखल झाल्यावर त्याने दमदार कामगिरी केली आणि आपले संघातील काम त्याने कायम राखले.

भारतीय संघातील तो एक महत्वाचा खेळाडू ठरला होता आणि त्यामुळे त्याच्या लग्नाची जोरदार चर्चा सुरु झाली होती. पण हे सर्व सुरु असतानाच अजित एका सुंदरीच्या प्रेमात पडला होता. एकिकडे क्रिकेटची कारकिर्द बहरत असताना त्याची लव्हस्टोरीही फुलत होती. अजितच्या गर्लफ्रेंडचे नाव होते ते फातिमा.

फातिमा हे नाव ऐकल्यावर हे लग्न काही सहजपणे झालं नसेल, हे तुम्हाला समजलं असेलच. फातिमा ही अजितच्या एका मित्राबरोबर त्याचे सामने पाहायला यायची, त्यावेळी त्याची आणि तिची भेट झाली. त्यानंतर दोघांची मेत्री झाली, दोघे एकमेकांना भेटत राहीले आणि मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर अजित आणि फातिमा हे एकमेंकाना डेट करत होते. या लग्नासाठी त्यांच्या घरातून विरोध होता. पण या दोघांनी मात्र आपला निर्णय कायम ठेवला.



### सोशल मीडियावर बरेच फोटो व्हायरल

**» घरून विरोध असला तरी अजित आणि फातिमा यांनी लग्न करायचे ठरवले. या दोघांची पहिली मुलाखत १९९९ साली झाली होती. त्यानंतर या दोघांनी ९ फेब्रुवारी २००२ साली लग्न केले. या दोघांना आता राज नावाचा मुलगाही आहे. अजित आणि फातिमा यांचे सोशल मीडियावर बरेच फोटो व्हायरल झाल्याचे पाहायला मिळाले आहे.**

# मेस्सीला ४४ कोटी डॉलर देण्याची तयारी; सौदीत रोनाल्डो विरुद्ध संघर्ष होण्याची शक्यता

। रियाध ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**स्टार फुटबॉलपटू लियोनेल मेस्सी आता सौदीतील क्लब अल हिलालकडून खेळण्याची चर्चा आहे. यासाठी मेस्सी आणि क्लबमधील चर्चा अंतिम टप्प्यात आली असल्याचे कळते.**

वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा संपल्यावर ख्रिस्तियानो रोनाल्डोने सौदी अरेबियातील अल्-नासेर क्लबकडून खेळण्यास सुरुवात केली. आता लिओनेल मेस्सी सध्याच्या मोसमाची सांगता झाल्यानंतर सौदीतील क्लबकडून खेळण्याची शक्यता आहे. त्याबाबत मेस्सी आणि सौदीतील अल्-हिलाल क्लबमधील चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे समजते. त्यांनी मेस्सीला सुमारे ४४ कोटी डॉलर देण्याची तयारी दाखवली असल्याचे समजते.

पीएसजीने मेस्सीला दोन आठवड्यांसाठी बडतर्फ केले आहे. त्याचबरोबर त्याच्यासह नव्याने करार करण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. ला लीगा अर्थात स्पॅनिश लीगने बार्सिलोनावर घातलेल्या निर्बंधामुळे मेस्सी त्याला घडवलेल्या क्लबकडे परतू शकणार नाही असे समजते. फुटबॉल कारकीर्द अंतिम टप्प्यात असलेला मेस्सी सौदीतील क्लबकडून खेळण्यास तयार असल्याचे समजते.कर्णधाराच्या एका निर्णयाने अखेरच्या ओव्हरमध्ये झाला चमत्कार; विजयाचा घास हिरावून घेतला

रोनाल्डोला अल्-नासेर क्लबने डिसेंबरमध्ये करारबद्ध केले. त्या वेळी त्याला प्रतिवर्षी २२ कोटी डॉलर दिल्याचे वृत्त होते. या करारामुळे रोनाल्डो जगातील सर्वाधिक मानधन मिळालेला क्रीडापटू झाला होता.




### सोमवारी सौदी अरेबियात गेला होता...

»आता अल्-नासेरचे पारंपारीक प्रतिस्पर्धी अल-हिलाल मेस्सीला करारबद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांनी मेस्सीला रोनाल्डोपेक्षा जास्त रक्कम देण्याची तयारी दाखवली आहे. मेस्सीला या करारामुळे ४४ कोटी २० लाख डॉलर मिळण्याची शक्यता असल्याचा अंदाज ब्रिटनमधील 'डेली टेलिग्राफ'ने वर्तवला आहे.

गेल्याच आठवड्यात अल्-हिलालने अल्-नासेरचा पराभव केला होता. अल्-नासेरच्या पराभवानंतर अल्-हिलालच्या चाहत्यांनी मेस्सी... मेस्सी असा गजर केला होता. दरम्यान, मेस्सीबरोबरील फेरकराराबाबतच्या प्रश्नावर पीएसजीने मौन बाळगले आहे. दरम्यान, मेस्सी सोमवारी सौदी अरेबियात गेला होता, यास दुजोरा मिळाला आहे. सौदी अरेबियाचे पर्यटन मंत्री अहमद अल खातीब यांनी या संदर्भात ट्वीट केले आहे.